# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १०.१०.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०९.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ८,२४२/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०४ केसमध्ये १७ ईसमावर कारवाई करून एकुण ९,७५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक ०९.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १०.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये २० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५६ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०२ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २६८ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ८५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १०१ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ८१ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका १० केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २५ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ६९ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०८२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०८ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३४ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०३३ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,९७,३५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १०.१०.२०२६ चे ०१.०० ते ०२.०० वा.चे दरम्यान, गिट्टीखदान पोलीसंचे पथक हे गुन्हेगार शोध मोहीम राबवित असतांना, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, सुरेंद्रगड, राधाकृष्ण मंदीर जवळ राहणारा ईसम अग्नीशस्त्र बाळगुन आहे. अशा मिळालेल्या सुचनेवरून, वेदप्रकाश लालजी मिश्रा, वय ३५ वर्षे याचे राहते घरी गेले. पंचासमक्ष त्याचे घराची झडती घेतली असता, आरोपी वेदप्रकाश मिश्रा याचे राहते बेडरूममध्ये पलंगाचे उशीखाली एक लोखंडी गावठी अग्नीशस्त्र मॅगझीनसह व ०२ जिवंत काडतुस मिळुन आले. आरोपीचे ताब्यातुन प्राणघातक अग्नीशस्त्र मॅगझीनसह व ०२ जिवंत काडतुस असा एकुण किंमती २५,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र जिवंत काडतुसह

बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ३,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सारंग मिराशी, सपोनि. लालपालवाले, पोउपनि. खुशाल राठोड, पोहवा. संदीप चनगोले, बालकृष्ण राठोड व पोअं. रमेश बंजारा यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०९.१०.२०२६ चे ०९.०० ते ०९.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे काका नामे तुळशीराम सिताराम पाटील, वय ६० वर्षे हे त्यांचे हिरो पॅशन प्रो दुचाकी क्र. एम.एच. ३७ एच ५९७३ ने त्यांचे मित्र नामे प्रभाकर खोडे यांचेसह डबलसिट जात असतांना, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, हिंगणा टि—पॉईंटकडुन वैशाली नगरकडे जाणाऱ्या रोडवरील शर्मा धान्य भंडारजवळ त्यांचे मागुन येणाऱ्या एका अनोळखी ऑटो चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे काकाचे दुचाकीला मागुन धडक दिल्याने, फिर्यादीचे काका यांचे डोक्याला मार लागला व त्यांचे सोबत असलेले प्रभाकर खोडे यांचे पायाला मार लागल्याने दोघेही गंभीर जखमी झाले. ऑटोचालक जखमींना कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पळुन गेला. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे काकांना तपासुन मृत घोषीत केले. प्रभाकर खोडे यांचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी भुषण विश्वनाथ पाटील, वय ४४ वर्षे, रा. प्लॉट नं. १९, वैशाली नगर, हिंगणा रोड, एमआयडीसी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे ऑटो चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),१२५(ब),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४, १३४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी ऑटो चालकाचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०६.१०.२०२६ चे १२.०० वा. ते दिनांक ०९.१०.२०२६ चे १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट नं. ३ ए, दुर्गा मंदीर जवळ, निरंजन नगर, नागपूर येथे देशमुख चे घरी किरायाने राहणारे फिर्यादी संदीपकुमार मृत्युंजय शाहु, वय ३६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह बाहेरगांवी नातेवाईकाचे घरी कार्यक्रमाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचा कुलूप तोडून, घराचे आंत प्रवेश करून, बेडरुममधील लोखंडी कपाटातील रोख ६०,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,९०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. अमोल शिंदे ९७६४४९९०९९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**